R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६ प्रती अंक रु. ५/-

वर्ष ५२ वे, अंक ८ वा, मुंबई. जून २०१९ वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## स्वाभिमानशून्य अभिमानी

\- संपादकीय

मी एका शिक्षण संस्थेचा संचालक होतो. आमच्या संस्थेच्या खूप माध्यमिक शाळा असल्याने दरवर्षी १५ ते २० शिक्षक नेमण्याची आवश्यकता असे. त्यांच्या मुलाखती घेतांना मला प्रकर्षाने जाणवले की वरवरची उत्तरे खरी नसतात. खोलांत जावून प्रश्न विचारल्यावर पितळ उघडे पडत असे.

तुम्हाला वाचनाची आवड आहे कां ? या प्रश्नाचे कोणीही "हो" असेच उत्तर देत असे. पण जेव्हां चार वृत्तपत्रांची नांवे सांगा, किंवा अग्रलेख म्हणजे काय ? वगैरे प्रश्न विचारल्यावर अनेकजण निरुत्तर होत असत. कोणी म्हणे मी पुस्तकांचे वाचन करतो. वृत्तपत्रे वाचत नाही. तेव्हा चार वाचलेल्या ग्रंथांची नांवे मी विचारत असे किंवा तुम्हाला आवडलेल्या पुस्तकाचे नांव विचारत असे. त्यावेळीही वरील प्रमाणेच अनुभव यायचा. कोणी एखादे नांव सांगे. पण त्या वरुनही त्याची आवड लक्षांत येई. वाचनाचा दर्जा लक्षांत येत असे. ह्या ग्रंथाचा नेमका विषय काय होता असे विचारल्यावर, आवडत्या ग्रंथाचा विषयही सांगता येत नसे. तो ग्रंथ का आवडला तेही सांगता येत नसे.

याला सन्माननीय अपवाद असत व त्यांचीच निवड करणे क्रमप्राप्त असे. अनेक प्रश्नांना आपण हो उत्तरे देतो पण तो "हो" खरा नसतो. संस्कार/विविध गुण/या संदर्भात सगळ्यांचीच उत्तरे होकारार्थी असतात. पण ते खरे नसते. खरे व खोटे यांत चांगले काय ? ह्याचे उत्तर १००% लोक खरे बोलावे हेच देतील. पण ते उत्तरच खरे नसते. आपले देशावर प्रेम आहे का ? देशाचा अभिमान आहे कां ? याची उत्तरे सर्वांचीच होकारार्थी येतील. पण ह्या उत्तराला कांही निकष लावून खोलांत जावून परीक्षा घेतल्यास कांही सन्माननीय अपवाद सोडता ९०% लोक अनुत्तीर्ण होतील.

या पद्धतीने तुमच्या आमच्या "अभिमान विषयांची" खोलवर परिक्षा घेतली तर हाच अनुभव येईल. मुळांत अनेकांना त्यांचे अभिमान विषयच सांगता येत नाहीत. मग आपण त्याला मदत केली व आई-वडील-पत्नी-मुले यांचा अभिमान वाटतो का असा प्रश्न विचारल्यास १००% लोक "हो" असेच उत्तर देतील. हे उत्तर वरील कांही उदाहरणांइतके दयनीय नसते. खरोखरच अनेकांना या विषयांत अभिमान असतो. पण त्या अभिमान विषयांमुळे त्यांच्या व्यक्तीत्वात/वर्तनात काय विशेष व्यवहार घडतो याचे उत्तर देणे अनेकांना शक्य होत नाही. कारण त्या अंगाने त्या अभिमानाचा परिपोष झालेलाच नसतो. नुसताच अभिमान असतो. मी त्याला वांझोटा अभिमान म्हणतो. या विषयांत मी कोणाचीही उलटतपासणी किंवा सखोल परिक्षा घेतली नसली तरी अनेक प्रसंगातून मला त्या अभिमान विषयाची परिक्षा घेता आली आहे व त्यांत ते नापास झाले आहेत. किंवा काठावर उत्तीर्ण झाले आहेत. अगदी शुल्लक कारणावरुन ही नाती पार मोडीत निघाली आहेत. कोणी म्हणेल अभिमान वेगळा व व्यवहार वेगळा. हे मी समजू शकतो. पण अभिमान विषय अितका तकलादू असतो की अगदी क्षुल्लक कारणाने अभिमानाची जागा वैराने किंवा हेटाळणीने घ्यावी हे लक्षांत घेतल्यास मूळ भूमिका किती उथळ असते हे लक्षांत येते.

तरीही या विषयांत थोड्याफार समाधानाला जागा आहे. पण जन्मभर ज्या कुटुंबव्यवस्थेत आपण वाढलो त्याबाबतीत




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

# समाचार

वर्ष ५२ वे, अंक ८ वा,
जून २०१९
(फक्त सभासदांसाठी)



श्री. विलास जोशी
अध्यक्ष

श्री. प्रभाकर कुलकर्णी
कार्याध्यक्ष

श्री. प्रसाद ठकार
कार्यवाह

श्री. प्रदीप कुलकर्णी
कोषाध्यक्ष

*संपादक*

श्री. प्रभाकर अ. संत
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**



**दूरध्वनी :** २४३०२२७३, २४३०७५७३
**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in


कांही समाधानाची जागा असली तरीही त्याच्या पलिकडे विचार केल्यास "अभिमान विषय" व त्यांचा कस अगदीच नगण्य स्वरुपाचा असतो. त्या विषयाची फुशारकी मात्र जबरदस्त असते.

कौटुंबिक मर्यादेच्या पलिकडे, कुटुंबाचा, कुळाचा, ज्ञातीचा, जातीचा, गांवाचा, जिल्ह्याचा, राज्याचा, देशाचा, संस्कृतीचा, विविध संस्कारांचा, परंपरेचा, "अभिमान" खरोखर कितीसा असतो व असल्यास त्याच्या सत्व परीक्षेत तर सोडाच पण वरवरच्या परीक्षेत आपण कितीसे यशस्वी होऊ याचा गांभीर्याने विचार करायला हवा. या विषयांत कोणालाही विचारा तो अत्यंत फुशारकीने या विषयांत विलक्षण अभिमान असल्याचा पुकारा करेल. पण ते फारसे खरे नसते. वैचारीक भूमिकेत थोडे समाधानकारक हाती येईलही पण त्या संदर्भात कृती विषयक खोलवर पडताळणी केल्यास हाती काय येईल हा गंभीर प्रश्न आहे.

अनेकांना कुळाचा अभिमान असतो. पण मुळ कुठले तेच त्यांना माहीत नसते. ज्यांना मुळ गांव माहीत असते त्यांनी ते पाहिलेले नसते किंबहुना तशी उत्सुकता पण नसते. ह्याच पद्धतीने वरील सर्व अभिमान विषयांत आपण फारच तोकडे पडतो. त्या पलीकडे कुळाच्या परंपरेचा विचार तर शोधून सापडणे कठीण असते. ह्याला सन्माननीय अपवाद असतात पण ते खरोखरच अपवादात्मक असतात. जागतीकरणामुळे हे अभिमानाचे विषय बाद होऊ लागले आहेत हे मी समजू शकतो, पण अतिथ्यशीलता, व्यासंग, परमत सहिष्णुता, अशा संदर्भातील सांस्कृतीक परंपरा व त्यांचा अभिनिवेश, अभिमान बाजूला टाकून कसा चालेल ?

खरे सांगायचे तर बहुतांशी लोक प्रवाहपतीत व आजचा दिवस कसा तरी पुढे ढकलणारे, उथळ जीवनप्रवासी आहेत.

सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे चिमण्या कावळ्याप्रमाणे आपण आपले संसार करीत आहोत. ना कसला अभिमान, ना कसला अभिनिवेश, ना कोणते ध्येय, ना कोणता जीवन हेतू.

मी शिर्षक दिले आहे "स्वाभिमानशून्य अभिमानी". स्वाभिमानाचा विचार नंतर करु पण मुळांत आपण बहुतांशी अभिमानशून्य जगतो आहोत हे लक्षांत घ्यायला हवे.

यात सगळ्यांत गंभीर विषय असा आहे की जे अभिमान विषय असायला हवेत ते सोडून अयोग्य विषय अभिमान विषय म्हणून समाजांत रुढ होताहेत व त्याचा वेग विलक्षण आहे.

जाती व्यवस्थेविरुद्ध सावरकरांनी पोटतिडकीने लिहले आहे. ज्ञानेश्वर, वारकरी संप्रदाय, भागवत धर्म व अनेक संतानी व समाजधुरीणांनी, विचारवंतांनी हजारो वर्षे हा विषय मांडला आहे. पण अलिकडच्या १५/२० वर्षांच्या काळांत, तेही जागतीकरणाच्या पार्श्वभूमिवर हा विषय नको तेव्हढा विकृत अवस्थेला पोहचला आहे व त्याचा विखार दिवसे दिवस वाढतो आहे.

मला सांगायला लाज वाटते आहे पण पुढील वस्तुस्थितीचा गांभिर्याने विचार व्हायला हवा. देशस्थ ऋग्वेदी ज्ञातीसंस्थांनी समर्थ रामदास व एकनाथ यांना शिरोधार्य मानले आहे. यजूर्वेदी संस्थांनी ज्ञानेश्वर व याज्ञवल्क्य यांना घट्ट धरले आहे व चितपावन ब्राह्मण ज्ञातीसंस्थानी परशुरामाला मंचकी बसवले आहे. त्या त्या ज्ञातीसंस्थांनी आपापली दैवते पूजनीय ठरवली यांत तसे वावगे नाही. पण त्या ज्ञातीसंस्थांनी अन्य ज्ञातींची दैवते अडगळीत

टाकावी हा गंभीर प्रश्न आहे. हा ज्ञाती अहंकार अयोग्य मार्गाने प्रवास करतो आहे व त्याची मुळे विलक्षण घट्ट होत आहेत. हा अहंकार ब्राह्मण ज्ञातीचा असा नसून त्यातील पोट ज्ञातीचा असा हा अहंकार आहे. सावरकर अन्य संत व विचारवंतांना पार निकालात काढून हे चालले आहे. ज्ञाती संस्था असू नयेत असे नाही. त्या संस्थांनी ज्ञातीबांधवांचे प्रश्न सोडवावेत व त्यांची उन्नती करावी यांत कांहीच गैर नाही. पण हे करताना ज्ञातीच्या पलीकडे एकूण हिंदुसमाजाचे संदर्भातील किंवा एकूण भारतीय संदर्भातील किमान कर्तव्ये व किमान जबाबदाऱ्या यांकडे किंचीतही दुर्लक्ष होता कामा नये याचे भान केव्हां येणार ?

हे ब्राह्मणांचे बाबतीतच आहे असे नाही. मी अनेक जातीच्या व त्यांच्या पोटजातीच्या मेळाव्याला हजर राहीलो आहे. तेथेही असेच अयोग्य मार्गाचे वळण आहे. हे गेल्या १५/२० वर्षांत वाढीस लागले आहे व ते मोडून काढणे आतां कर्मकठीण आहे.

अभिमानशून्य समाजांत अयोग्य अभिमान मात्र खोलवर रुजतो आहे. असे विपरीत, अयोग्य अनेक अभिमान विषय कधी नव्हे तेव्हढे मूळ धरत आहेत व त्यांचा वेग प्रचंड आहे.

प्रादेशीक पक्षांना यश येवू लागल्यावर, प्रांताभिमानावर आधारीत पक्ष वाढू लागले व ते पक्ष सर्व मर्यादा, संकेत ओलांडून कार्यरत आहेत. संपूर्ण भारताचा विचार हा अगदीच नगण्य ठरत आहे. आपण स्वातंत्र्य यासाठी मिळवले का ?

महाराष्ट्राचा व मराठी भाषेचा अभिमान मी समजू शकतो पण भारताच्या संदर्भात ह्या विषयाच्या मर्यादा विचारांत घेतल्या जात नाहीत तेव्हा आपण किती उथळ व स्वार्थी विचार करतो याबद्दल मनाला वेदना होतात. दुर्दैव असे आहे की प्रांतवादाचा माहोल व वादळ एव्हढे प्रचंड आहे की भारताचा विचार विलक्षण, क्षीण झाला आहे. भारताचा विचार प्राथम्याने व्हायला हवा. त्याहून वाईट असे की महाराष्ट्र व मराठी भाषेचा अभिमान नाटकी, उथळ व स्वार्थावर आधारलेला आहे.

गेले काही दिवस दुकानाच्या पाट्या मराठीत असायला हव्यात असे आंदोलन झाले. तसे काही कायदेही व नियमही झाले. कांही दिवस थोडे यशही आले. चळवळीला यश थोडे आले पण अशी चळवळ करणाऱ्यांना यश अधिक आले. तरीही माझी तक्रार नाही व त्याबद्दल मला खंत नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी या चळवळ करणाऱ्यांनी काहीच केले नाही.

मराठीचा आग्रह "स्व" भाषा म्हणून आला ना ? पण मराठींत पाट्या आल्या म्हणजे "स्व" यशस्वी झाला कां ? Diamond Hotel हे मराठीत लिहले की Diamond व Hotel "स्व" कसे होणार ? हल्ली मोठ्या इमारतींना Heights असे म्हणतात. ते मराठीत लिहले तरी Heights राहतेच व त्याहून सोपा मिनार हा शब्द मागे पडतो. याची अनंत उदाहरणे देता येतील. आपण खरे तर परधार्जीणेच आहोत व उगाच चुकीच्या पद्धतीने "स्व" कुरवाळत असतो. मराठीचे पुरस्कर्ते आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकातात ही सुद्धा उथळ चर्चा आहे. मराठींत पाट्या हा तसाच उथळ "स्व" चा अविष्कार आहे. दुकानांची, इमारतींची विविध संस्थांची नांवे इंग्रजी व पाश्चात्य संस्कृतीवर आधारीत आहेत. त्याबद्दल कोणालाही खंत नाही. फक्त ती संस्कृती मराठी अक्षरांत जोपासली गेली तर आम्हाला चालते. म्हणजे याचा अर्थ आपला "स्व" किती तोकडा व उथळ आहे. मराठीच्या स्वाभिमानांत खरोखर "स्व" संस्कृतीचा बळी जातो याचा साधा विचारही चळवळींत येत नाही व त्या अंगाने छोटीशी कृती होत नाही याचाच अर्थ स्वाभिमानशून्य अभिमान असा होतो हे कोणाच्या लक्षांत येतच नाही. मराठीचा / स्वभाषेचा / स्वप्रांताचा / स्वजातीचा अभिमान असणे यांत कांहीच गैर नाही. पण त्याच वेळी त्यापेक्षा मोठ्या परिघाचा विचार व त्या संदर्भातील कर्तव्ये यांचे अगत्य भान असायला हवे.

संपूर्ण भारताचा विचार अनेक अंगानी निकालांत निघतो आहे याची कोणालाही खंत नाही. "स्व" देश पेक्षा "स्व" प्रांत असाच आपला प्रवास आहे. इतीहासाने वारंवार दणके देवूनही आपण आपला "स्व" स्वार्थी, मर्यादीत व उथळ ठेवतो आहोत. याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. शिवाय राष्ट्राचे संविधान विरोधी व राष्ट्रविरोधी प्रवास थांबायला हवा. प्रत्येक गोष्टी हे असे अयोग्य चालले आहे. मूळ गाभ्याचा "स्व" चा विचार न करता भलत्याच गोष्टीला "स्व" म्हणून आपण कवटाळत असतो. मूळ विषयाला हात घालायचाच नाही अशी आपली साऱ्यांची उथळ पद्धती आहे.

या सर्व विवेचनाचा अर्थ एव्हढाच आहे की आपण सर्व उथळपणाने विचार करत आहोत. प्रगल्भता केंव्हा येणार ? कां असेच स्वाभिमानशून्य अभिमानी राहणार ?

# कृतज्ञतेचा निर्देशांक

**डॉ. लक्ष्मीकांत दाणी,** मो. ९८२०४ ३७०७३
Email: laxmikant1411@yahoo.com

असंच एकदा एक मासिक चाळताना त्यातील एका लेखामधील एका वाक्याने मला विचारमग्न केलं. आयुष्यातली सकारात्मकता याविषयावरचा तो लेख होता. मूळच्या इंग्रजीमधील लेखामधील ते वाक्य असं होतं; "Sometimes, try calculating your gratitude index in life, you will realize how lucky you are!". (कधीतरी तुमच्या आयुष्यातील कृतज्ञता निर्देशांक मोजण्याचा प्रयत्न करा आणि तुम्हाला लक्षात येईल की तुम्ही किती नशीबवान आहेत ते!). मला कृतज्ञतेचा निर्देशांक ही कल्पनाच भन्नाट आवडली. जसं स्टॉक मार्केट मध्ये स्टॉक इंडेक्स किंवा ट्रेडिंग इंडेक्स असतात आणि त्यांच्या मूल्यावरून बाजाराची तब्येत ठरवली जाते, तसाच कृतज्ञताभावनेचे चढउतार मोजणारा हा कृतज्ञता निर्देशांक आपल्या मानसिकतेची तब्येत ठरवू शकेल असं मनात आलं. लगेच माझ्या डोक्यात विचारचक्र सुरु झालं की माझ्या आयुष्यातल्या कृतज्ञता कशा मोजायच्या ? कृतज्ञता निर्देशांक कसा ठरवायचा ? आणि तो दैनंदिन जीवनात कसा आणायचा ? अधिक विचार केल्यावर मला काही कल्पना सुचल्या त्या अशा;

१. **माझ्या निसर्गदत्त संपदांबद्दल कृतज्ञता मानणे :** म्हणजे धडधाकट शरीर मिळालं, धडधाकट अवयव मिळाले, विचारी संवेदनशील मन मिळालं, या बद्दल कृतज्ञता बाळगणे. मला लक्षात आलं की धडधाकट शरीर असणं, कार्यक्षम अवयव असणं हे आपण गृहीत धरतो, पण कार्यक्षम डोळ्यांची किंमत नेत्रविहीन व्यक्तींना विचारात घेतलं तर कळेल, धडधाकट हातापायांची किंमत अपंगांना विचारात घेतलं तर कळेल. संवेदनशील विचारी मनाची किंमत मनोरुग्णांची परिस्थिती पाहून कळेल. आणि एकदा हा मुद्दा लक्षात आला की निरोगी, सुदृढ शरीराबद्दल आपोआप कृतज्ञता मनात दाटून येईल.

२. **मला मिळालेल्या नात्यांच्या बाबतीत कृतज्ञता मानणे :** आपल्याला लाभलेले माता, पिता, बहीण, भाऊ, काका, मामा, आत्या, मावशी आपलं विस्तारित कुटुंब यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगणे. ही नाती जन्म झाल्यावर आपल्याला सहज मिळतात म्हणून खूप वेळा किंमत नसते आपल्याला. छोट्या छोट्या कारणांनी रुसवे फुगवे धरतो आपण. पण या नात्यांची किंमत अनाथाश्रमात वाढणाऱ्या मुलांना पाहून कळेल. त्यांच्या डोळ्यात मायेच्या एका स्पर्शासाठी आसुसलेली व्यथा दिसली की लक्षात येतं की सकाळी उठल्यावर देवाला नमस्कार करून झाल्यावर नमस्कार करण्यासाठी आईवडील असणं हे किती भाग्याचं लक्षण आहे ते. भांडायला, खेळायला, एकत्र वाढायला भावंडं असणं, हट्ट पुरवायला, लाड करायला मामा, काका, मावशी, आत्या असणं याची जाणीवपूर्वक कृतज्ञता बाळगणं इतक्या महत्त्वाची नाती खचितच आहेत ही.

३. **मला मिळालेल्या साधन संपदेबाबत कृतज्ञता मानणे :** म्हणजे राहायला घर असणं, घरात सुखसोई असणं, निजायला अंथरुण असणे, पांघरायला पांघरुण असणे, घालायला कपडे असणे, अभ्यासाला पुस्तके वह्या मिळणे, चांगल्या शाळेत शिक्षण मिळणे, चवीपरीने खायला मिळणे, जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी अर्थार्जनाची प्रतिष्टीत सोय असणे अशा एक नाही अनेक गोष्टी कृतज्ञता बाळगण्यासारख्या नाहीत का ? चहा थोडा गार झाला तर चिडतो मी. पण वनवासी पाड्यावर गेलं की लक्षात येतं की मुळात जगण्याची धडपड म्हणजे काय असते. दोन वेळच्या भरपेट जेवणाची किंमत काय ? थंडी वाऱ्यापासून संरक्षण मिळण्यासाठी गरम कपडे सोडाच पण किमान कपडे असणं याची किंमत किती ? या साऱ्या गोष्टी मला सहज मिळाल्या आहेत तर मी याबाबत कृतज्ञता नको का बाळगायला ?

४. **माझ्या आयुष्यात आलेल्या इतर माणसांविषयी कृतज्ञता मानणे :** मला तळमळीने शिकवणारे शिक्षक, मार्गदर्शक, शेजारी पाजारी, आपले फॅमिली डॉक्टर, ड्राइव्हर, कामवाली मावशी, कचरा घेऊन जाणारी बाई, बिल्डिंगचा वॉचमन अशा एक नाही अनेक व्यक्तींबद्दल जाणीवपूर्वक कृतज्ञता बाळगणे महत्त्वाचं नाही का ?

विचार करु लागलो आणि ही यादी लांबच लांब होऊ लागली. यातून एक जाणवलं की ज्या ज्या गोष्टींमुळे माझं जीवन सुसह्य झालं आहे, सुरळीत झालं आहे, सुखावह झालं आहे त्या त्या प्रत्येक वस्तू, व्यक्ती, परिस्थितीबद्दल मनात दररोज जो कृतज्ञभाव निर्माण

होईल त्यावरुन त्यादिवशीचा कृतज्ञता निर्देशांक ठरवायचा. हा कृतज्ञता निर्देशांक मला दररोज जागृत ठेवणं इतकाच नाही तर वाढत ठेवायचा प्रयत्न करायचा आहे. त्यासाठी मी एक उपाय शोधून काढला आहे. जी जी व्यक्ती माझ्या संपर्कात येईल त्या व्यक्तीला शक्यतो संधी शोधून 'धन्यवाद' देण्याचा परिपाठ अमलात आणला आहे. सकाळच्या दुधवाल्यापासून ते दररोज घरचा कचरा नेणाऱ्या बाई पर्यंत सगळ्यांना ते जेव्हा समोर येतील तेव्हा 'थँक यू' असं ठरवून म्हणण्याची सवय स्वत:ला लावून घेतो आहे. अगदी कुठे जात असेन आणि रिक्षा केली तर उतरल्यावर पैसे देऊन झाल्यावर रिक्षावाल्याचा खांद्यावर हलके थाप मारुन आवर्जून 'थँक यू' म्हणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. गम्मत म्हणून अशा किती जणांना मी दिवसभरात 'थँक यू' म्हटलं याची माझ्यापुरती नोंद ठेऊन त्या दिवसाचा कृतज्ञता निर्देशांक दररोज रात्री निजण्यापूर्वी मी काढण्याचा प्रयत्न करतो. इतर कुठल्याही निर्देशांकासारखा दररोजचा हा आकडा कमी जास्त होतो खरा पण एकूण कृतज्ञता निर्देशांकाचा महिनाभराचा आलेख (ग्राफ) हा चढता असला पाहिजे याचा प्रयत्न मात्र जरूर करतो.

या सगळ्या खटाटोपानंतर मला स्वत:ला एक मोठा फायदा असा जाणवला की ज्यांना मी धन्यवाद देतो त्या व्यक्तींना बरं वाटत असेलही मनात, पण माझ्या दृष्टीकोनातून पाहता माझं मन एका अनामिक समाधानाने भरून जातं. पाय जमिनीवर राहतात, माणसं जपली जातात आणि सर्वात महत्त्वाचं की या सर्व व्यक्तीत वसणाऱ्या हृदयस्थ परमेश्वरापर्यंत प्रत्येकवेळी माझं थँक यू आपोआपच पोहोचतं...

म्हणूनच ज्याने मला हे जीवन दिले, मला जगण्यासाठी श्वास दिला, पोटासाठी अन्न दिले अशा परमेश्वराला थँक्यू म्हणण्यासाठी मी दिवसाच्या चोवीस तासातील किमान चोवीस मिनिटे दिली पाहिजेत. भगवंताचे नामस्मरण हीच त्याच्या प्रती व्यक्त होणारी कृतज्ञता! आणि ह्याचा कृतज्ञता निर्देशांक माझा मीच मोजण्याची सवय मला लावून घ्यायला हवी!

**नाती :** माणूस जेव्हा पत्रावळीवर जेवत होता तेव्हा तो पाहुण्यांना पाहूनच फुलून जायचा ....पाहुण्यांच्या स्वागतासाठी कुटुंबासह यजमानाच्या अंगणातली वेल ही फुलून यायची. काळ बदलला आणि माणूस मातीच्या भांड्यात जेवण करु लागला .....सोबतच नात्यांना पण मातीसारखे जपू लागला. काळ बदलला आणि माणसानं पितळेची भांडी वापरायला सुरुवात केली ....तो दर सहा महिन्यांनी नात्यांना कल्हई करु लागला. काळ बदलला आणि माणसाला काचेची भांडी आवडू लागली ....एखादा छोटासा धक्का किंवा ओरखडा सुद्धा नात्यांना सहन होईना. काळ बदलला आणि जेवणाची ताटे ही प्लॅस्टिक आणि थर्माकोलची झाली .....सगळेच नातेसंबंध जणू त्याच्यासारखे युज ॲण्ड थ्रो होऊ लागले. आहे ना खरं.... ? विचार करा.

**प्रार्थना :** प्रार्थना म्हणजे ती नाही. जी आपण हात जोडून, गुढघ्यावर बसून देवाकडं काहीतरी मागण्यासाठी केलेली असते...! प्रार्थना तीच असते, जी सकारात्मक विचार करून लोकांसाठी काहीतरी चांगली इच्छा करणं, ही खरी प्रार्थना...!! जेव्हां तुम्ही मित्राला आलिंगन देता, ती प्रार्थना असते...! जेव्हां तुम्ही कुटुंबाच्या पोषणासाठी अत्यंत चांगल्या मनानं स्वयंपाक करता, ती प्रार्थना असते...!! जेव्हां आपण लोकांना निरोप देताना, त्यांच्या चांगल्या प्रवासासाठी शुभेच्छा देतो, ती प्रार्थना असते...!! जेव्हां आपण आपली ऊर्जा आणि वेळ देऊन एखाद्याला मदत करतो, ती प्रार्थना असते...!! जेव्हा आपण कोणाला तरी मनापासून माफ करतो, ती प्रार्थना असते. प्रार्थना म्हणजे कंपने असतात. एक भाव असतो. एक भावना असते. एक विचार असतो. प्रार्थना म्हणजे प्रेमाचा आवाज असतो. मैत्री, निखळ नाती, हे सगळं म्हणजे प्रार्थनाच तर असते...!!

## भावपूर्ण श्रद्धांजली



श्री. हरीभाऊ जतकर, अध्यक्ष, ब्राह्मण महासंघ, सोलापूर; उपाध्यक्ष, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, सोलापूर, सल्लागार, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई, यांच्या पत्नी सौ. सुनंदा हरीभाऊ जतकर, वय - ८३ यांचे दि. ३१/०५/२०१९ रोजी पहाटे २ वाजता वृद्धापकाळामुळे निधन झाले आहे. **मध्यवर्ती मंडळातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!**

## भारतीय स्त्री शक्ती, डोंबीवली शाखेतर्फे झालेल्या 'पालकपण' निबंध स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळालेला निबंध

– सौ. प्रभा साळवेकर

एका महिन्यापूर्वी १९८५ साली एस्. एस्. सी. पास झालेल्या माझ्या विद्यार्थ्यांनी आम्हा शक्षिकांना त्यांच्या रियुनिअनमध्ये सामावून घेतले होते. शालेय आठवणींची उजळणी करतांना प्रल्हाद चौधरी म्हणाला, "मॅडम पूर्वी आम्ही आईबाबांचे ऐकायचो आता आम्हाला आमच्या मुलांचे ऐकावे लागते" बाकीच्या सर्वांनीच त्याची री ओढली: पालकपणात झालेला हा बदल मी माझ्या कुटुंबात व आजूबाजूला पहात होतेच. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत सर्वच क्षेत्रात अतिशय वेगाने होणाऱ्या बदलांच्या प्रवाहात सामावून घेणाऱ्या पालकांपुढे पालकपण निभावणे हे एक आव्हान आहे. नोकरी करणारे पतिपत्नी नियोजनपूर्वक पालकत्व स्वीकारतात. तरी सुद्धा तंत्रज्ञान आत्मसात करणाऱ्या आपल्या पाल्याच्या शारीरिक बौद्धिक विकासामुळे पालकपणाचे आव्हान अधिक जटील झाले आहे.

२१ व्या शतकात, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, वावरत असतांना व स्पर्धात्मक जीवन जगत असतांना पालकांची मुलांना लहानाचे मोठे करतांना दमछाक होते. त्यातच प्रसारसाध्यमांमुळे समजणाऱ्या बलात्कार, मुलांच्या आत्महत्या (विशेषत: मन्मय म्हैसकर) बालगुन्हेगारी अशा बातम्यांमुळे पालकांच्या मनावर भीतीचे सावट पसरते. आपण आपले पालकपण निभावतांना कमी तर पडणार नाही ना याचा ताण त्यांच्या मनावर असतो. अशावेळी पालक मुलांच्या मानसशास्त्रावरील पुस्तके, लेख वाचतात. पालकांच्या मार्गदर्शनासाठी आयोजित केलेल्या कार्यशाळांना हजेरी लावतात. वाचलेले, ऐकलेले भावतेही, पटतेही. पण प्रत्यक्षात तसे वागतांना अनेक अडचणी येतात. पहिली अडचण म्हणजे आईवडील भिन्न कुटुंबातून व काहीशा प्रमाणात भिन्न संस्कार घेऊन आलेले असतात. शिवाय प्रत्येक मूल स्वतंत्र असते. ते मारी बिस्कीटाप्रमाणे अनेक पापुद्रे असलेले असते. त्या मुलामध्ये अनुभवाचे, शिकण्याचे, समजून विश्लेषण करण्याचे, व्यक्त होण्याचे अनेकानेक पापुद्रे असतात. हे पापुद्रे समजून घेऊन त्याग करणे व योगदान देणे म्हणजे पालकपण निभावणे. मुलाचे आईवडील दोघेही पालक असले तरी मुलाला जन्म देणे व स्तनपान करणे या नैसर्गिक गोष्टींमुळे आईमुलामध्ये जास्त जवळीक असते. म्हणून पालकपणाची जबाबदारी आईवर अधिक असते हे वास्तव आहे. पालकपणाचे स्थूलमानाने मुलाचे बालपण (जन्म ते वयवर्ष ८) व पौगंडावस्था (वयवर्षे ९ते१९) असे दोन टप्पे असतात.

बालपणाचा पहिला टप्पा असतो तान्हेपणाचा. याकाळात बाळाचे विश्व घरापुरते मर्यादित असते. ते परावलंबी असते. त्याला पालकांचे प्रेम व स्पर्श हवा असतो. नोकरीवरुन घरी आल्यावर आईने मुलाला जवळ घेतले की ते आनंदी, आश्वस्त होते. अशा प्रकारे आई पालकपण निभावते. मूल बालवाडीत, पाळणाघरात जाऊ लागल्यावर, आईने घरी आल्यावर आपल्या सर्व गोष्टी लक्षपूर्वक ऐकाव्यात. आपले कौतुक करावे आपल्याला जवळ घ्यावे या मुलाच्या अपेक्षा पूर्ण करणे म्हणजे पालकपण निभावणे ही भूमिका म्हणजे योगदान देणे. त्याग कशाचा करायचा तर आपण दमलो आहोत, आपल्यावर ताण आहे या भावनेचा. आई हे उत्तम करु शकते कारण आपल्या मुलाची तिला ओढ असते. या काळात मुलाला सांभाळणारी बाई, घरातील इतर कामे करणारीबाई, पाळणाघरातील स्त्रिया यांचे सहकार्य, मुलाच्या लहानमोठ्या आजारात किंवा नोकरीनिमित्त बाहेर गावी जावे लागले तर सासूसासऱ्यांची किंवा आईवडिलांची मदत व मुख्य म्हणजे साथीदाराचा भक्कम पाठींबा यामुळे आईला पालकपण निभावणे सुकर होते. पालकपणाच्या दुसऱ्या टप्प्यावर असतांना, पालक ऑफीसमध्ये वरच्या पदावर पोहचलेले असतात. त्यांचे काम, कामाच्या वेळा, व्यवधाने वाढलेली असतात. मुलाच्या या पौगंडावस्थेची पूर्वपौगंडावस्था म्हणजे वय वर्षे ९ ते १२ हा काळ. या काळात त्याच्या मेंदूतील "प्रीफंटल कॉर्टेक्स" विकसीत व्हायला सुरवात झालेली असते. आपण मोठे झालो आहोत. आपल्याला जबाबदार व्यक्ती समजावे असे त्याला वाटू लागते. त्याचाच उपयोग पालकपण निभावतांना करता येतो. त्याच्याशी विचारविनिमय करुन त्याचे ट्यूशन क्लास, छंद वर्ग, क्रीडा वर्ग निवडावेत. मात्र आपण घरी असतांना त्याची क्लासची वेळ असू नये याकडे लक्ष द्यावे. आपण नोकरी मजा म्हणून नाही तर कुटुंबाची व स्वत:ची गरज म्हणून करतो हे एकदा मुलाला समजले की त्याचा तक्रारीचा सूर कमी होतो. त्याच्यासमोर मोबाईलवर बोलण्यापूर्वी त्याला सांगणे, विरंगुळा म्हणून टी.व्ही. पहावासा वाटतो हे त्याला पटवून देणे हेच तर त्याग न करता पालकपणाचे योगदान आहे. सुट्टीच्या दिवशी त्याच्या आवडीचा पदार्थ करणे, त्याच्यावर एखाद्या कामाची

जबाबदारी सोपवणे व तो ती पूर्ण करेल याची खात्री बाळगणे हे त्याला सुखावह असते. दररोज झोपायला जाण्यापूर्वी त्याच्या डोक्यावरुन हात फिरवणे म्हणजे जवळीक वाढविण्याची व पालकपण निभावण्याची मुख्य पायरी आहे. मुलाचे वयवर्षे १३ ते १९ हा काळ पालकपणाच्या कसोटीचा काळ असतो. मुलगा किंवा मुलगी मोबाईलवर धोकादायक खेळ खेळत नाहीत ना ? इंटरनेटवरुन नको त्या वयात नको त्या गोष्टी पहात नाहीत ना ? या विचारांची टांगती तलवार पालकांच्या मनावर असते. अशा वेळी समवयस्क मुलांच्या बाबांनी गट करुन असे खेळ किंवा अशी माहिती कोणत्या साईटवर आहे हे एकमेकांना सांगावे. आपला पाल्य त्यात अडकत नाही ना याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष देणे हे पालकपण अवघड आहे. पण अशक्य नाही. वयात येतांना स्त्रीपुरुषात शारीरिक व मानसिक बदल काय होतात याची माहिती आईबाबांनी एकमेकांना द्यावी. जेणेकरुन मुलीला किंवा मुलाला सजग करण्यात व खाचखळगे सांगण्यात दोघांचा सहभाग असेल. थोडक्यात पालकपण निभावतांना आईवडिलांमध्ये सामंजस्य व सहकार्य असले पाहिजे. भवकम कुटुंबव्यवस्था असलेल्या आपल्या देशात एकल पालकत्व निभावणे कठीण आहे. साथीदाराच्या मृत्यूने किंवा घटस्फोटाने एकल पालकत्व नाईलाजाने स्वीकारावे लागते. आपण विचारलेल्या प्रश्नांनी पालक दुःखी होतात या अनुभवाने मुले घुमी होतात. आपल्या मनातील दुःख किंवा कटुता न दाखवता मुलांना परिस्थितीची जाणीव करुन देऊन त्यांच्या कडूनच सहकार्याची मागणी करावी लागते. तरच एकल पालकपण निभावता येते. काही वेळा मुले पालक झाले तरी मोठ्यांचे पालकपण संपत नाही. परगावी असलेल्या मुलांच्या अडीअडचणीला त्यांच्याकडे जावे लागले. मुले परदेशी असतील तर मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी जावे लागते. इतर ही कारणाने जाता येते पण तेथे करमत नाही म्हणून आपला देशच बरा असे म्हणत परतावे लागते. फोन वरुन बोलणे आणि स्काईपवरुन पहाण्यातच समाधान मानत पालकपण निभवावे लागते. एकत्र कुटुंब असेल तर नातवंडाच्या जन्मानंतर परत एकदा सक्रीय पालकत्व आनंदाने स्वीकारले जाते. दुधावरच्या साईला दुसऱ्याकडे सोपवणे नको वाटते. मुलाला संभाळायला स्वयंपाकाला, इतर कामाला बाई या सुविधा पुरवल्या जातात. नातवाला स्वतःच्या नाही तर बाळाच्या आईच्या तंत्रानी वाढवावे लागते. बाया असल्या तरी जबाबदारी आपली असते. मूल थोडे मोठे झाले की ते सोशल व्हावे म्हणून त्याला पाळणाघरात पाठवले जाते. ज्येष्ठ पालक परत एकाकी होतात. नातवंडे जशी मोठी होत जातात तसे त्यांच्या मित्रमैत्रिणी, इंटरनेट, व्हॉट्सअप अशा विस्तारलेल्या विश्वात ज्येष्ठ पालकांना स्थानच नसते.

---

## अहंकार सोडून, निगर्वी होऊन आणि निःशंकपणे. परमेश्वर पहायचा नाही, ऐकायचा नाही, फक्त अनुभवायचा.

लेखक - श्रीकांत कुलकर्णी, बदलापूर

गाढ झोपेतही हृदयाचे स्पंदन चालू रहाणे, श्वासोश्वास चालू रहाणे, पचनक्रिया चालू रहाणे, खाल्लेल्या अन्नाचे रक्त निर्माण होणे, पृथ्वीतलावर पाणी निर्माण होणे, शरीरांतर्गत सर्व इंद्रियांनी शिस्तपूर्वक कामे करणे, अंतराळातील प्रत्येक ग्रहगोलांनी भ्रमणकक्षा सांभाळणे, फुलांमध्ये सौरभ निर्माण होणे, बीजातून वृक्ष निर्माण होणे, बाळाच्या जन्माआधी मातेच्या स्तनात दूध निर्माण होणे. पिलासाठी आधीच चाऱ्याची सोय निर्माण होणे, एवढ्याशा स्वरयंत्रातून अब्जावधी वेगवेगळे ध्वनी निर्माण होणे, दोन डोळे, दोन कान, एक नाक, दोन ओठ यातून निर्माण होणाऱ्या एवढ्या विविधता निर्माण होणे, मेंदूत लक्षावधी आठवणी मुद्रित होणे, एकदा चालू झालेले हृदय शंभर वर्षे सुद्धा दिवसरात्र अविश्रांत स्पंदत रहाणे, बोललेल्या स्वरांचे ऐकणाऱ्याच्या मेंदूत बरोबर अर्थ उमजणे, सर्वत्र परमेश्वराची सत्ता जाणवते. परमेश्वर पहायचा नाही, ऐकायचा नाही, फक्त असा अनुभवायचा. अहंकार सोडून, निगर्वी होऊन आणि निःशंकपणे. जयाच्या बळे चालतो हा पसारा। नमस्कार त्या ब्रम्हतत्त्वा अपारा।।

---

### मध्यवर्तीमध्ये विष्णुसहस्त्रनाम पठण

दि. २९ जून २०१९ रोजी शनिवारी एकादशीनिमित्त दुपारी ४ ते ६ पर्यंत मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात विष्णू सहस्त्रनाम व स्तोत्राच्या पाठाचे पठण गीता फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केले आहे. सदर कार्यक्रमास आपण अवश्य उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घ्यावा व ज्यांना यात सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी व्यवस्थापक श्री. विकास माने (भ्रमणध्वनी ९१३७१७४३२०) यांच्याकडे नांव नोंदणी करावी. कार्यक्रम वेळेवर सुरु होईल याची नोंद घ्यावी.

## डॉ. एल. एम. दाणी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्लेतील सभागृहात संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत दाणी यांच्या "Mantras for Career Success" या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ अक्षय तृतीयेच्या शुभमुहुर्तावर, दि. ०७ मे २०१९ रोजी आयोजित केला होता. हे पुस्तक डॉ. लक्ष्मीकांत दाणी यांनी संस्थेचे अध्यक्ष कै. ॲड. माधवराव अनगळ यांना समर्पित केले. संस्थेचे कार्यवाह सदानंद घोटीकर यांनी श्री. मोहन टंकसाळे, माजी चेअरमन सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शरद झरेगावकर, सी.एफ.ओ. इंडस इंड बँक, डॉ. शिरहट्टी, जे.जे.टी. विद्यापीठ, डॉ. वलेचा यांची थोडक्यात ओळख करुन दिली. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मोहन टंकसाळे, मुख्य अतिथी श्री. शरद झरेगावकर व डॉ. लक्ष्मीकांत दाणी यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली. यानंतर संस्थेच्या सभासद सौ. माधवी केतकर यांनी सरस्वती वंदना गायली. श्री. मोहन टंकसाळे व श्री. शरद झरेगावकर यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. संस्थेचे कार्यवाह श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी श्री. मोहन टंकसाळे, श्री. शरद झरेगावकर, योगेश जोशी व आनंद कुलकर्णी यांची ओळख करुन दिली. पुस्तकाचे प्रकाशन झाल्यावर डॉ. शिरहट्टी, जे.जे.टी. विद्यापीठ आणि डॉ. वलेचा यांनी डॉ. दाणी यांच्या पुस्तकावर विचार मांडले. श्री. योगेश जोशी, अध्यक्ष - जनसंपर्क टाटा ग्रुप ऑफ कंपनीज यांनी पुस्तकातील अनेक बाबींवर सखोल मते व्यक्त केली. संस्थेचे सभासद श्री. आनंद कुलकर्णी यांनी देखील थोडक्यात पुस्तक हे फक्त विद्यार्थ्यांसाठी नसून प्रत्येक वयाच्या व प्रत्येक व्यवसायाच्या नागरिकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे असे म्हटले.

यानंतर श्री. शरद झरेगावकर यांनी पुस्तकावर आपले विचार करताना गितेतील अनेक श्लोकांचा संदर्भ देऊन हे पुस्तक कसे उपयोगी ठरेल याबद्दल विस्तृत विवेचन केले. तसेच डॉ. दाणी यांनी अशीच पुस्तके पुढील काळात लवकरात लवकर लिहून प्रसिद्ध करावीत अशी विनंती केली. श्री. मोहन टंकसाळे यांनी पुस्तकावर आपले मत मांडताना डॉ. दाणी यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी पुस्तक प्रसिद्ध केले याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि पुस्तकातील विविध अनेक विषयांवर खुमासदार पद्धतीने विश्लेषण केले. व डॉ. दाणी यांना अशीच पुस्तके लिहीत राहण्याची विनंती केली. डॉ. दाणी हे नियमितपणे समाचारमध्ये लेखन करत असतात व त्यांच्या लेखाचे महाराष्ट्रात सर्वत्र कौतूक होत असते.

शेवटी डॉ. दाणी यांनी या पुस्तकातील प्रत्येक विषयावर थोडक्यात माहिती दिली व हे पुस्तक लिहीण्याची प्रेरणा संस्थेचे अध्यक्ष ॲड. कै. माधवराव अनगळ यांनी दिली असे सांगीतले. त्याचप्रमाणे यापुढेही विविध विषयावर पुस्तके लिहण्याची इच्छा व्यक्त केली. संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. माधव जोशी यांनी आभार प्रदर्शन केले व प्रमुख पाहुणे तसेच उपस्थित नागरिकांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.




### वसईच्या कु. नम्रता आंबेवाडीकर हीचे १२वीत अपूर्व यश!



वसईच्या नम्रता मंदार आंबेवाडीकर हीने १२ कॉमर्स मध्ये अपूर्व यश संपदान केले आहे. तिला ६५० पैकी ६०४ (९२.९२%) गुण मिळाले आहेत. मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन!

## बेळगाव देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्यावतीने उपनयन कार्यक्रम

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ व समर्थ को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्यावतीने अनगोळ येथील रामनाथ मंगल कार्यालयात सामूहिक उपनयन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १२.३० च्या शुभ मुहूर्तावर उपस्थितांकडून बालकांच्या माथ्यावर अक्षता टाकून त्यांना शुभाशीर्वाद देण्यात आले. त्यानंतर बालकांना ब्रह्मोपदेश करण्यात आला. बेळगावातील विविध ठिकाणाहून आलेल्या एकूण तीन बालकांचा यावेळीउपनयनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देशस्थ मध्यवर्ती मंडळ मुंबईचे विलास कुलकर्णी, प्रभाकर संत, तेसच बेळगावचे प्रसिद्ध उद्योगपती राम भंडारे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी चेअरमन एन. डी. पाटील, व्हा. चेअरमन सुहास कुलकर्णी, प्रदीप कुलकर्णी, विनय कुलकर्णी, अभय जोशी, विनायक जोशी, अरुण कुलकर्णी, चंद्रशेखर आळतेकर, छाया जोशी, सुनंदा आळतेकर, राघवेंद्र गुडी, एन. बी. देशपांडे, अरविंद कुलकर्णी, राघवेंद्र केसनूर तसेच समर्थ सोसायटी कर्मचारी आदींचे सहकार्य लाभले.



बेळगाव : उपनयन सोहळ्यात सहभागी बालकांसमवेत पालकवर्ग.



वरील किंमतीत आपल्या लाडक्या बाप्पाच्या मूर्ती आपल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, बदलापूर शाखेतर्फे विक्री करिता उपलब्ध आहेत. मुर्तीचे बुकींग १५ जुलै पर्यंत घेण्यात येईल. ॲडव्हान्स रक्कम हॉटेल रुचिरा येथे जमा करावी. सर्व मुर्ती शाडूच्या आहेत. तरी आपण याचा प्रचार व प्रसार करुन जास्तीत जास्त मुर्ती आरक्षित करुन मंडळास हातभार लावावा. आपला विश्वासू महेश जोशी व संपूर्ण कार्यकारी मंडळ.



## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ. कल्याण संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व २०१९-२१ या वर्षासाठी द्वैवार्षिक कार्यकारणी निवड.

– रमेश दत्तात्रय पालकर, कार्यवाह.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ. कल्याण संस्थेतर्फे रविवार दिनांक १२ मे १९ रोजी श्री त्रिविक्रम मंदिर सभागृह, पारनाका कल्याण येथे २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व द्वैवार्षिक निवडणूक आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत गेल्या वर्षीचा वार्षिक सभा वृतांत वाचुन तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच सभेत सन २०१८-१९ या वर्षाचा जमाखर्च व ताळेबंद मांडण्यात आला तसेच २०१९-२० या वर्षासाठीचे अंदाजपत्रक वाचुन त्यांस सर्वानुमते मंजुरी घेण्यात आली.

याच सभेत २०१९-२१ या दोन वर्षांसाठी निवडणूक न घेता बिनविरोध ११ सदस्यांच्या नव्या कार्यकारणीस सभेत मंजुरी देण्यात आली. या सभेसाठी ६० सभासदांची उपस्थिती होती. रुचकर आमरस भोजनानंतर या सभेची सांगता झाली. दिनांक १९ मे १९ रविवार रोजी संस्थेच्या नवीन कार्यकारणीची बैठक होऊन त्या बैठकीत सर्वांमते खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. १. श्रीमान सुरेश विष्णुपंत कुलकर्णी, अध्यक्ष २. श्रीमान अरविंद वासुदेव खळदकर, उपाध्यक्ष ३. ॲड. सौ. संपदा ललितकुमार कुळकर्णी, उपाध्यक्ष ४. श्रीमान रमेश दत्तात्रय पालकर, कार्यवाह ५. श्रीमान. दिपक कल्याणराव देशपांडे, कोषाध्यक्ष सभेनंतर सर्वांना पेढे वाटून सभा संपन्न झाली.

---

## नविन सभासद

<u>**(कराड, जिल्हा सातारा):**</u> १) श्री. प्रभाकर कृष्णाजी उंब्रजकर २) श्री. अरुण गोविंद पंचपोर ३) सौ. गोरी गौतम निलाखे ४) श्री. काशिनाथ धोंडो देशपांडे ५) श्री. निखिल प्रसाद आगवेकर ६) श्री. निरंजन गोविंद इनामदार ७) सौ. आरती निरंजन इनामदार ८) श्री. किशोर मुरलीधर काळे ९) श्री. गोविंद वासुदेव घळसासी १०) श्री. मिलींद पांडुरंग केसकर ११) सौ. संहिता सचिन गरुड १२) श्री. सचिन राजराम गरुड १३) कल्याणी मंगेश बोरकर १४) श्री. महेश सुरेश कुलकर्णी १५) श्री. राजेश सुरेश काळे १६) श्री. महेश श्रीकांत चांदोरकर १७) श्री. अक्षय मोहन रुईकर १८) श्री. प्रकाश विलास कुलकर्णी १९) श्री. अजय अरविंद कुलकर्णी २०) श्री. संतोष गजानन देशपांडे २१) श्री. सुधीर किसन कुलकर्णी २२) श्री. संतोष विलास देशपांडे २३) श्री. चंद्रशेखर महादेव देशपांडे २४) श्री. अरुण पांडुरंग कुलकर्णी २५) श्रेया सुयोग भिंताडे २६) श्री. दिलीप गोपाळ जोशी २७) श्री. दत्तात्रय गजानन पानसरे २८) श्री. विनय विजय भोसेकर २९) सौ. गायत्री विनय भोसेकर ३०) श्री. राजेश प्रकाश शेंडे ३१) श्री. संतोष प्रकाश शेंडे ३२) श्री. पुष्कर सतीश आळतेकर ३३) श्री. श्रीधर नारायण घळसासी ३४) श्री. दत्तात्रय रामचंद्र जोशी ३५) श्री. श्रीकर विठ्ठल कुलकर्णी ३६) श्री. सुरेश एकनाथ कुलकर्णी ३७) त्रिशती दत्तात्रेय कुलकर्णी ३८) श्री. देवदत्त सुनिल फलटणकर ३९) श्री. शिशिर पंडीत कुलकर्णी ४०) सौ. संध्या संजय राजोपाध्ये ४१) श्री. संजय वसंतराव राजोपाध्ये ४२) सौ. मिनाक्षी दिलीप वाचासुंदर ४३) श्री. दिलीप शामराव वाचासुंदर ४४) श्री. प्रकाश वासुदेव जोशी ४५) सौ. स्मिता व्यंकटेश कुलकर्णी ४६) श्री. अच्यूत बाळकृष्ण देशपांडे ४७) सौ. रसिका रविंद्र शेंबेकर ४८) श्री. अमित दीपक कुलकर्णी ४९) अमृता अमित कुलकर्णी ५०) श्रीमती संजिवनी शामराव कुलकर्णी ५१) श्री. अवधूत रामचंद्र गरुड ५२) मानसी अवधूत गरुड <u>**बत्तीस शिराळा (सांगली जिल्हा)**</u>: ५३) शुभदा संजय जोशी ५४) श्री. प्रथमेश संजय जोशी <u>**श्रीक्षेत्र नृसिंहवाडी (जिल्हा कोल्हापूर)**</u>: ५५) श्री. विकास दिगंबर पुजारी ५६) श्री. विनोद भानुदास पुजारी ५७) श्री. बाळासाहेब गोविंद कुलकर्णी ५८) श्री. गिरिष रघुनाथ खोंबारेपुजारी ५९) श्री. मुकुंद सखाराम पुजारी ६०) श्री. संदिप मोहन वाडीकर

---

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कोथरुड कर्वेनगर, पुणे यांचेतर्फे College Library सुरु करण्यात येत आहे तरी गरजू युवकांनी याचा लाभ घ्यावा. ह्या योजनेमध्ये ज्यांना आपली गत वर्षाची पुस्तके द्यायची असतील त्यांनी संपर्क साधावा. १०वी, १२वी, मेडिकल, इंजीनियरींग, इत्यादी. पुस्तके घरी वर्षभर वाचण्यासाठी मिळतील. **संपर्क : श्रीराम कुलकर्णी : ९६८९७९०१०५ ऑफिस : ०२०-२५४४१३३३**

## माझे पती माधवराव अनगळ - श्रीमती हेमा माधवराव अनगळ

**गेले निघुनी सोडूनी आम्हा घाव घातला काळाने। जीवन उद्ध्वस्त जाहले दुर्भाग्य हेमाचे, काय करावे या हेमाने।**

माझ्या आयुष्यातला काळाकुट्ट दिवस म्हणजे माझे प्रिय पती माधवराव आम्हाला सोडून स्वर्गवासी झाले. काळाने फार मोठा घाव आमच्या कुटुंबावर घातला. त्यांच्या गुणांचे कौतुक करण्यास माझ्या जवळ शब्दच नाहीत. अजातशत्रू , सर्व जगावर प्रेम करणारे, सर्व क्षेत्रात आघाडीवर, सर्वश्रुत, अत्यंत तल्लख बुद्धी असे माधवराव आज कोणाला जराही कल्पना नसताना अचानक आमच्यातून निघून गेले. आयुष्यभर हे दुःख विसरणे अशक्यच आहे. शहाद्यासारख्या खेडेगावात त्यांचा जन्म झाला. वडील वकील होते, सर्वच अनगळ तल्लख बुद्धीचे होते. श्रीमंतीचा गर्व कधी त्यांना शिवलाच नाही. अचानक मोठ्या वन्सचे मिस्टर वारले. आत्याच्या संसाराचा भार पण त्यांना सोसावा लागला. स्वतःची सहा भावंडे, आत्त्याची चार व वन्संची पाच इतके मोठे कुटुंब या चार भावांनी सांभाळले. सासऱ्यांची वकिली चालेनाशी झाली कारण त्यांना बहिरेपणाआला. तरीही न डगमगता सर्वांना सांभाळून त्यांनी वाटचाल केली. आमच्या गावी कॉलेज नसल्याने अमळनेरला इंटर नंतर लॉ कॉलेज केले. रात्री प्रेसमध्ये नोकरी व सकाळी कॉलेज करून लॉ चे शिक्षण पूर्ण केले. वयाच्या एकविसाव्या वर्षी वकिली सुरू केली. उमदे सुरेख व्यक्तिमत्व व मुख्य म्हणजे तल्लख बुद्धिमत्तेच्या जोरावर वकिलीत चांगला जम बसवला. प्रत्येक केसमध्ये अभ्यासपूर्वक व परिश्रमाच्या जोरावर यश मिळत गेले. पुढे बारा वर्ष एक चांगला अनुभव यावा म्हणून न्यायाधीश झाले याचा त्यांना फारच छान उपयोग झाला. एकंदरीत सर्वत्र त्यांना यश मिळत गेले. सर्व क्षेत्रात त्यांची प्रगती होती. तसेच गायन-वादन यांचे उत्तम ज्ञान होते कोणत्याही विषयावर त्यांना विचारले तर आपले समाधान होईपर्यंत ते तो विषय समजून सांगत. पुढे परत त्यांनी हायकोर्टात प्रॅक्टीस चालू केली. त्यांच्या शब्दकोशात माघार हा शब्दच माहित नव्हता. गोरगरिबांची कामे स्वतः पदरमोड करून ते करीत असत. पैसा मिळवणे हे त्यांचे ध्येय नव्हते प्रत्येकाचे काम करताना ते निरपेक्ष बुद्धीने करीत, लक्ष्मीचा त्यांचेवर वरदहस्त होता. बऱ्याच संस्थांची कामे त्यांनी केली. देशस्थ ऋग्वेदी पार्ले संघ हे त्यांचे अपत्य होते. जिवापाड मेहनत करून पंजाब नॅशनल बँकेची केस ते जिंकले. तेथे आज हॉल बांधला आहे. माझं मन अभिमानाने भरून आले. महिला संघ, शाळा यांचे प्रश्न त्यांनी सोडवले. कोणाबद्दल मनात आढी नाही, सर्वांशी सलोख्याचे संबंध त्यामुळेच सर्वांच्या मनांत त्यांच्याविषयी प्रेम आपुलकी होती. घरीदारी सर्वत्र त्यांना मानाचे स्थान होते. जगमित्र असतात तसेच हे होते. मला, मुलांना व इतरांनाही कधीही कोणावर रागावले नाहीत. कोणाशी अबोला नाही. सर्वांना प्रेम देणार व समजून घेणे हा त्यांचा अंगीभूत गुण होता म्हणूनच त्यांचे सर्वांशी मित्रत्वाचे नाते होते. मला प्रत्यक्ष देव भेटला. अशा या अजातशत्रूला देवाने आमच्यापासून हिरावून घेतले. 'जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला' पण आम्ही मात्र पोरके झालो. माझ्या आयुष्यातील आनंदाचे दिवस सरले. अहोरात्र सगळ्यांचीच काळजी करणारे कधीच न सापडणारे माझे पती मला दुःखाच्या खाईत टाकून गेले. मृत्यूसुद्धा त्यांनी शांतपणे स्वीकारला. असे सर्वांना आवडणारे व्यक्तिमत्व काळाने हिरावून नेले. देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

---

**भगवद्गीतेची संथा - प्रशिक्षण** : दादर येथील श्री चंद्रकांत दत्तात्रय उर्फ श्रीकृष्ण जोशी समस्त गीता अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना भगवद् गीता "संथा" पद्धतीने शिकवतात. श्री. जोशी गुरुजींचे वय ८१ असून या वयातही ते भगवद् गीता संथेचे वर्ग गिरगाव, दादर, बोरीवली भागात ९ ठिकाणी घेतात. त्यांचे हे काम गेली १२ वर्षे अव्याहतपणे चालू आहे. विशेषतः गुरुजी निस्पृह व निष्काम सेवाभावी वृत्तीने हे काम करीत आहेत. अनेक शिष्यांना त्यांनी भगवद् गीता शिकवली असून त्यांचे विद्यार्थी एक पाठी म्हणून दाखवितात. भगवत गीता एकपाठी म्हणून दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुरुजी श्रुंगेरीच्या श्री शंकराचार्यांकडे घेऊन जातात व शंकराचार्यांच्या हस्ते त्यांचा रु. २५,०००/- देऊन सत्कार केला जातो.

श्री. वंदनीय जोशी गुरुजींचा "भगवद् गीता"अनोखे पठण हा कार्यक्रम दे.ऋ.ब्रा. संघ विलेपार्ले येथे दि. १८-५-२०१८ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास ७० ते ८० गीताप्रेमींनी उपस्थिती लावली होती. ज्या संस्थांना जोशी गुरुजींचा हा अनोखा कार्यक्रम करायचा असेल त्यांनी श्री. शरद झरेगावकर मो. नं. ९८२०१३००९० यांच्याशी संपर्क साधावा.

## वधू पाहीजे

**चि. सौरभ धनंजय लोहोगावकर**

**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण **गोत्र :** अत्री
जन्मतारीख : २६ एप्रिल १९८४ पत्रिका पाहणार.
उंची : ५ फुट ४ इंच, वर्ण : सावळा, आई/वडील आहेत
शिक्षण : B.Sc. (Biotech) MBA (Supply Chain) IIM नोकरी : फार्मा कंपनीत, मुंबई. मा.प्रा. रु. ७०,०००/- मंगळ आहे निर्दोष
वधुसंबंधी अपेक्षा : ग्रॅज्युएट, नोकरी आवश्यक, शाकाहारी, अनुरुप.
पत्ता: ५०३, श्रद्धादीप हौ. सो. दत्तपाडा रोड, जयानगर (जे.बी.खोत हायस्कूल जवळ), बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६.
संपर्क मोबाईल: ९८६९०३९४६६
ईमेल: sloha84@gmail.com

## वर पाहीजे

**अपूर्वा मोहन बहिरट**

**पत्ता:** ३६६/२०, श्री साईनाथ हौ. सो., सेक्टर ३, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ६७. रक्तगट: A+
**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ **गोत्र :** बादरायण
**जन्मतारीख :** ११ जुलै १९९३ पत्रिका पाहणार.
**उंची :** ५ फुट, **आई/वडील आहेत**
**मंगळ नाही.** **शिक्षण :** ग्रॅज्युएट (बी.कॉम.)
**व्यवसाय :** नोकरी. **बहिण एक विवाहीत.**
**वरसंबंधी अपेक्षा :** अनुरुप, निर्व्यसनी, मुंबई स्थित, उच्चशिक्षित, स्वतःचे घर.
**संपर्क मोबाईल:** ९८७०७१४७३०
**पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** सौ. सुलभा मोहन बहिरट, ३६६/२०, श्री साईनाथ हौ. सो., सेक्टर ३, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ६७.

## वधू पाहीजे

**चि. वेदप्रकाश सदाशिव पानसे (प्रथमवर)**

**जन्म तारीख :** २३/०६/१९७९ **/जन्मस्थळ :** सातारा
**वेळ:** सायंकाळी ५.१० मि./**रास:** वृषभ / **नक्षत्र:** मृग
**नाडी:** मध्य/ **चरण:** पहिले / **गण:** देव / **उंची:** ५फुट ८इंच /
**शिक्षण:** B.Com + G.D.C.A. + Computer Diploma + MSCIT + MS Tally/ नोकरी : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग / सहाय्यक लेखा - अधिकारी / वर्ग २ गॅझेटेड ऑफिसर / नोकरीत कायम / मा. प्र. रु. ५०,०००/- अपेक्षा : किमान पदवीधर/नोकरी असल्यास-नसल्यास चालेल / शाकाहारी/ बहिणः भाऊ नाहीत, एकुलता एक मुलगा आहे. वडिलः सेवानिवृत्त / आईः गृहिणी / कुटुबाची शाखा: देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण / गोत्रः मुद्गल / आहार संपूर्ण शाकाहारी / घर सातारा येथे बांधले आहे. पालकः श्री. सदाशिव हरी पानसे, ३२८/२/३, प्लॉट नं.७, पार्वती निवास, शिवनगर, M.I.D.C., सातारा - ४१५ ००४. मो.: ९५४५५१७१४९ फोनः ०२१६२/२४८१०९ मो.: ९३२६७२६६४८ ईमेलः pansevinit@rediffmail.com

## वधू पाहीजे

**चि. मकरंद सुनिल काटकर**

**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी. **गोत्र :** जमदग्नी.
**जन्म तारीख :** ०७/०७/१९८९ **वय:** २९ वर्षे.
**उंची:** ५ फूट ५ इंच मंगळ आहे (निर्दोष)
**वर्ण:** गव्हाळ **शिक्षण:** B.E. (Instrumentation)
**व्यवसाय:** Asst. Consultant, TCS Ltd., Thane, Mumbai.
**मासिक आय:** ८५,०००/- पत्रिका पाहणार आहे.
आई-वडील आहेत.
**वधु अपेक्षा:** सुस्वभावी, अनुरुप
**पत्ता:** श्री. सुनिल रघुनाथ काटकर, ब्लॉक नं. ३, तुलसी निवास को.हौ.सोसा., रॉयल कॉस्मो क्लब जवळ, डॉ. मिरजकर दवाखान्याच्या मागे, पनवेल - ४१०२०६.
**मोबाईल:** ९९३०२८२५९५/९६१९८९०६४४

# जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील

उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,

आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची

किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,

सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.



# श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)

H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद

Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद

Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद

Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद

Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.

Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.

Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.

Life Member : Insurance Corporate Retired Employees Association

Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad

Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.



ISO 9001 : 2015 प्रमाणित

# समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## २००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

* समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा *

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ९% (१ वर्षासाठी)**

**३२ शाखांमधुन कार्यरत**

* मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ * कल्याण-०२५-२२२३२९२१/२३ * ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ * वाशी - ०२२-२७८८००१४/१५

* पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ * हडपसर - ०२०-२६८१०७१२/१३ * चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१९१९

बाणेर ०२०-२७२९२५००/०१ * कोथरुड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ * सिंहगड रोड- ९८८१७११८३० * पिंपरी-०२०-२७४१२९२१/२७४१३०३०

* कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ * सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ * मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

* सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८ शाखा कार्यरत *

**IndusInd Bank**

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date
## as your Bank Account Number.

120000 11275

Our Other Innovations

Indus Mobile FINGER PRINT BANKING Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.
Alternately, you can visit our website : www.indusind.com

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

## Mukund R. Hulyalkar - Paint Technologist

| | |
|---|---|
| President | : Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : ISSPA Central Committee |
| Secretary | : Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : Winner's Circle - Thane |
| Member | : BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com

R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

### ❀ वैशिष्ट्ये ❀

वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण उपलब्ध

❖ ❖ ❖ ❖

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ ● Email : aadrbm@gmail.com


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक प्रभाकर अनंत संत यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१, येथे छापून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक श्री. प्रभाकर अनंत संत